पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

मा. "फ" प्रभाग समिती

विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक ०१

सभावृत्तांत

दिनांक – ०९/०५/२०१९ वेळ : दु १२. २० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची विशेष सभा गुरूवार दिनांक ०९/०५/२०१९ रोजी दु १२. २० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह, मुख्य इमारत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८ या ठिकाणी मा.राजेंद्र निंबाळकर (भा.प्र.से) पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे ४११००५ यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
२) मा.संजय बबन नेवाळे
३) मा.घोलप कमल अनिल
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे

या शिवाय मा.प्रभावती गाडेकर - प्रशासन अधिकारी -फ प्रभाग समिती कार्यालय, ह्या उपस्थित होत्या.

-------

**पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा** – सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. फ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

प्रभाग समिती सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सुचना करतो.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा )** – मा. फ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणूक करणेकामी एकूण १ (एक) नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे -

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे | मा.घोलप कमल अनिल | मा. कुंदन अंबादास गायकवाड |

( प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेले एकूण १ (एक) नामनिर्देशन पत्र मा.पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले.)

Scanned with CamScanner

( मा.पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

**पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा**

मा. फ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एका उमेदवाराचे १ (एक) नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असुन त्यामध्ये मा. फ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

सबब, मा. फ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती, यांची निवडणूक घेणे ), नियम २००७ मधील नियम ६ (१) नुसार **मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या **बिनविरोध** निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

01.5.24

c/c (राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.)
पिठासीन अधिकारी तथा
अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा
"फ" प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

Scanned with CamScanner

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
## मा. "फ" प्रभाग समिती
## विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक ०१

विषय क्रमांक – १
विभाग – प्रशासन

ठराव क्रमांक – १
दिनांक –०९/०५/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समिती सभापती पदाकरीता मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे या उमेदवाराने एकूण १ (एक) नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल केले असून सदर नामनिर्देशनपत्र वैध ठरलेले आहे. सबब, फ प्रभाग समिती सभापती पदाकरीता मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे ह्या एकच वैध उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

९.५.२०१९

O/c

(राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.)
पिठासीन अधिकारी तथा
अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा
"फ" प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,
क्रमांक : फक्षेका/१/कावि/१२/२०१९
दिनांक :०९/०५/२०१९

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभा शाखा
"फ" प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned with CamScanner